# अमर हिंद मंडळ, दादर

**मुंबई - ४०० ०२८**

(स्थापना : १९४७)

(सार्वजनिक विश्वस्त नोंद क्रमांक एफ ४३ (मुंबई)
संस्था विधी नोंद क्रमांक १७८६/२५६ १९४९)

# ❋ द्वैवार्षिक अहवाल ❋

## १ एप्रिल १९९३ ते ३१ मार्च १९९५


अमरवाडी,
गोखले पथ (उत्तर),
दादर, मुंबई - ४०० ०२८
दूरध्वनी : ४२२ ३५ ८९


बुक - पोस्ट

श्री/श्रीमती ______________________


प्रेषक :
अमर हिंद मंडळ, दादर
गोखले पथ (उत्तर),
दादर, मुंबई - ४०० ०२८



गणेश प्रिंटर्स, ४१, शास्त्री बिल्डिंग, ज्ञान मंदिर रोड, दादर, मुंबई - ४०० ०२८
हॅलो - ४३७ ८६ ८८

मु.पृ.२.

## अमर हिंद मंडळ, दादर
### १ एप्रिल १९९३ ते ३१ मार्च १९९४ पर्यंत


**विश्वस्त** : श्री. ना. के. पडते (दि. २०-२-९४ पर्यंत)
श्री. ज. शं. परब
श्री. दि. शं. पाटील

**अध्यक्ष** : डॉ. पां. वि. चंद्रात्रेय (दि. २३-२-९४ पर्यंत)
श्री. शं. ना. साळवी (दि. २३-२-९४ पासून)

**उपाध्यक्ष** : श्री. ह. गं. राणे (दि. २०-२-९४ पर्यंत)
श्री. म. ज. फडके (दि. २३-२-९४ पासून)
श्री. ए. ना. साटम

**कार्याध्यक्ष** : श्री. श्री. का. भोसले (दि. १८-९-९३ पर्यंत)
श्री. चिं. वि. नागले (दि. ३-१०-९३ पासून)

**कार्योपाध्यक्ष** : श्री. वि शं. मांढरे (दि. २०-२-९४ पर्यंत)
श्री. र. मा. वरळीकर (२३-२-९४ पासून)

**कार्यवाह** : श्री. उ. व्यं. शेणॉय

**सं. कार्यवाह** : श्री. अ. गं. भालेकर (दि. १८-९-९३ पर्यंत)
श्री. सं. ग. ठाकूरदेसाई (दि. ३-१०-९३ पासून
दि. २३-२-९४ पर्यंत)

**कोषाध्यक्ष** : श्री. स. श. रेडीज

**सदस्य** : श्री. अ. अ. देशपांडे, श्री. वि. अ. कानविंदे, श्री. अ. दि. पाटील
श्री. स. ग. ठाकूरदेसाई (दि. ३-१०-९३ पर्यंत) (स्वीकृत दि. १-३-९४ पासून)
श्री. चा. शां. थरवल
श्री. चिं. वि. नागले (दि. ३-१०-९३ पर्यंत)
श्री. म. र. कुपेरकर (दि. १८-९-९३ पर्यंत)
श्री. ना. रा. नाबर (दि. १८-९-९३ पर्यंत)
श्री. न. ह. राणे (दि. १८-९-९३ पर्यंत)
श्री. र. मा. वरळीकर, स्वीकृत (दि. ३-१०-९३ ते दि. २३-२-९४)
श्री. म. ज. फडके (दि. ३-१०-९३ ते दि. २३-२-९४)
श्री. वि. दे. हरमले (दि. ३-१०-९३ ते दि. २३-२-९४) (स्वीकृत-दि. १-३-९४ पासून)
श्री. भा. भि. केरकर (दि. २३-२-९४ पासून)
श्री. स. वि. पेडणेकर (स्वीकृत दि. १-३-९४ पासून)
श्री. दि. बा. पडले (दि. २३.२.९४ पासून)
श्री. श्री. श्री. राणे (
श्री. वि. श्री. ...


## द्वैवार्षिक अहवाल
### दिनांक १-४-९३ ते ३१-३-९५

**सन्माननीय सभासद बंधुभगिनींनो,**

सादर वन्दे,

मंडळाच्या कार्याचा द्वैवार्षिक अहवाल तसेच जमाखर्च आणि ताळेबंद पत्रके आपणास सादर करण्यास कार्यकारी समितीस आनंद होत आहे.

या कालावधीत आपल्या बहुमोल सहकार्याने नेहमींचे सामाजिक,शैक्षणिक तसेच सांस्कृतिक उपक्रम कार्यवाहीत आणले गेले त्यास प्रतिसाद आणि प्रसिध्दीही चांगलीच लाभली.

### : वर्षागणिक अहवाल खालीलप्रमाणे :

### दिनांक १ एप्रिल १९९३ ते ३१ मार्च १९९४

**सभा** : वरील कालावधीत कार्यकारी समितीच्या एकूण १३ सभा आणि कार्यकारी समिती व विश्वस्त यांच्या एकूण ३ संयुक्त सभा झाल्या. (सभा उपस्थितीसाठी परिशिष्ट क्र. १ पाहा)

**तहहयात सभासद** : या कालावधीत एकही नवा तहहयात सभासद नोदविण्यांत आला नाही.

**वसंत व्याख्यानमाला** : मंडळाची ४६ वी वसंत व्याख्यानमाला सोमवार दिनांक ... एप्रिल १९९३ ते बुधवार दिनांक ५ मे १९९३ या काळात आयोजित करण्यात आली. (अधिक माहितीसाठी परिशिष्ट क्र. २ पाहा)

१९४७ पासून सातत्याने व्याख्यानमालेस हजर राहणारे मंडळाचे तहहयात सभासद श्री. श्रीराम परशुराम म्हात्रे यांचा यावेळी गौरव करण्यात आला.

**केटरिंग व्यवस्था** : दि. १-१-९४ ते ३१-१२-९४ कालावधीसाठी नेहमीच्या पध्दतीने निविदा मागवून फक्त भांडी व डेकोरेशनसाठी 'पवन कॅटरर्स आणि डेकोरेटर्स' यांना ठेकेदारी देण्यात आली.

**क्रीडाविभाग** : मंडळाच्या खो खो (पुरुष / महिला) व कबड्डी (महिला) संघांनी सर्वश्री प्रफुल्ल दा. पाटील, संजय वि. पेडणेकर, विष्णु दे. हरमले, संजीव ग. ठाकूरदेसाई यांच्या मार्गदर्शनाखाली मंडळाची क्रीडा क्षेत्रातील परंपरा कायम राखली. ऑक्टोबर १९९३ पासून क्रीडातज्ञ श्री. रमेश वरळीकर यांची क्रीडा विभाग प्रमुख म्हणून नेमणूक करण्यात आली.

जिल्हास्तरीय स्पर्धांबरोबरच राज्यस्तरीय आणि अखिल भारतीय स्तरावरील स्पर्धात खेळण्याचा मान आपल्या खेळांडूनी नेहमीप्रमाणे मिळविला. स्पर्धांतील काही ठळक वैशिष्टये खालीलप्रमाणे :

* मुंबई महापौर चषक राज्यस्तरीय खो खो स्पर्धेत आपल्या पुरुष आणि महिला संघांचा सहभाग.

* ठाणे महापौर चषक राज्यस्तरीय खो खो व कबड्डी स्पर्धेत आपल्या महिला संघाचा सहभाग.

* मराठा लान्सर, कटोल, नागपूर येथील अखिल भारतीय कबड्डी स्पर्धेत आपल्या महिला कबड्डी संघाने विजेतेपद पटकावून फिरता सुवर्णकरंडक पटकाविला. कु. सुचित्रा शिवलकर हिला उत्कृष्ट पकडीचे पारितोषिक देण्यात आले.

* स्वामी समर्थ यांच्या वतीने घेण्यात आलेल्या जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेत आपल्या महिला कबड्डी संघाने उपविजेतेपद तसेच कु. समिता राणे हिला उत्कृष्ट पकडीचे पारितोषिक मिळाले. दुर्गामाता मंडळ यांच्या जिल्हा स्तरीय कबड्डी स्पर्धेत विजेतेपद पटकाविले.

* औरंगाबाद येथे झालेल्या महिला क्रिडामहोत्सवातर्गत अजिंक्यपद खोखो स्पर्धेत आपल्या मंडळाच्या कु. अर्चना मयेकर आणि कु. उत्कर्षा शेणॉय यांचा मुंबई संघातून सहभाग.

**कलाविभाग** : सर्वश्री संजीव वढावकर, दिलीप दळवी यांच्या मार्गदर्शनाखाली आपल्या कलाविभागाने ३३ व्या महाराष्ट्र राज्य नाटय महोत्सवात **'मनावासना'** हे नाटक सादर केले. त्या नाटकास तृतीय पारितोषिक मिळाले. श्री. उदय कुलकर्णी आणि श्रीमती लीना नाईक यांना अनुक्रमे 'आबा' आणि 'आई' यांच्या भूमिकेबद्दल उत्तेजनार्थ पारितोषिके देण्यात आली.

नाटयदर्पण स्पर्धेच्या 'कल्पना एक, अविष्कार अनेक' या स्पर्धेतहि मंडळाने भाग घेतला. दि. १ मार्च १९९४ पासून कलाविभाग प्रमुख म्हणून श्री. विनोद हडप यांची नेमणूक करण्यात आली.

**इमारत निधी :** अहवाल काळात रु. १,००,०००/- (रुपये एक लाख) इमारत निधीमध्ये वर्ग करण्यात आले.

**देणगी** : मंडळाच्यावतीने अहवाल काळात खालील देणग्या देण्यात आल्या.

१) मा. श्री. प्रकाशभाई मोहाडीकर सत्कार समारंभासाठी सानेगुरुजी कथामालेला रु. ५०१/- (रुपये पांचशे एक)

२) सुप्रसिध्द क्रीडासमीक्षक मा. श्री. वसंत भालेकर यांना कै. एस्. एम्. जोशी पुरस्कार प्रदान समारंभप्रसंगी सहकार कला क्रीडा विज्ञान मंडळाद्वारे रु. १०१/- (रुपये एकशे एक)

**त्रैवार्षिक निवडणूक** : दिनांक ३० जानेवारी १९९४ रोजी मंडळाची त्रैवार्षिक निवडणूक स्वांतत्र्यसैनिक मा. श्री. पुरुषोत्तम य. म्हसकर यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आली. त्यांनी कोणतेही मानधन घेतले नाही. त्यांना सर्वश्री हरिष कसवणकर, सूर्यकांत धुरी आणि एन. डी. तुपे यांनी मदत केली. निवडणूकीचा निकाल २०-२-९४ रोजी झालेल्या वार्षिक सभेत जाहीर करण्यांत आला. (निकालासाठी परिशिष्ट क्र. ३ पाहा.)

नवीन कार्यकारी समिती दिनांक २३-२-९४ पासून कार्यरत झाली.

## इतर :

* अहवाल काळात भिंतीवरील ५ पंखे आणि आगप्रतिबंधक उपकरणे खरेदी करण्यात आली.

* मंडळाच्या घटनेमध्ये योग्य ते बदल सुचविण्यासाठी एक घटना समिति नेमण्यात आली.

* मंडळाचा आगामी सुवर्ण महोत्सव साजरा करण्यासाठी **'सुवर्ण महोत्सव निधी'** सुरु करण्याचा निर्णय घेण्यात आला.
* वाढती महागाई लक्षात घेऊन सभागृह भाडयात योग्य ती वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला.
* मंडळाचे सभासद, खेळाडू आणि हितचिंतक यांच्यातील सद्भाव वाढीस लागावा आणि उत्साहाचे वातावरण संस्थेत कायम राहावे या सद्हेतूने दि. २६ जानेवारी १९९४ रोजी सकाळी प्रजासत्ताक दिनानिमित्त ध्वजवंदनाचा आणि सायंकाळी स्नेहसम्मेलन, चहापान आणि सुप्रसिध्द संगीत दिग्दर्शक श्री. प्रभाकर जोग यांच्या मराठी वाद्यवृंदाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. अशा प्रकारचा कार्यक्रम प्रतिवर्षी आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला.
* प्रजासत्ताक दिन व वर्धापन दिनानिमित्त आयोजिल्या कार्यक्रमासंबंधी मंडळाच्या काही पदाधिकाऱ्यांविरूध्द धर्मादाय आयुक्तांकडे काही तहहयात सभासंदाकडून तक्रार दाखल करण्यात आली. तसेच मंडळाच्या जागेचा गैरवापर करण्याबद्दल मंडळ आणि पदाधिकाऱ्यांविरुध्दही तक्रार दाखल करण्यात आली.
* तहहयात सभासदांना हॉलच्या भाडयामध्ये १०% सवलत देण्याचा निर्णय घेण्यात आला.

❖ ❖ ❖

## श्रध्दांजली

मंडळाचे माजी विश्वस्त श्री. स. म. पुळेकर यांचे अहवाल काळात निधन झाले. दि. ८ मे १९९३ रोजी घेण्यात आलेल्यां शोकसभेत त्यांना श्रध्दांजली वाहण्यात आली.

## दिनांक १-४-९४ ते ३१-३-९५

**सभा** : या कालावधीत कार्यकारी समितीच्या एकूण १२ सभा आणि कार्यकारी समिती आणि विश्वस्त यांची १ संयुक्त सभा झाली. (सभा उपस्थितीसाठी परिशिष्ट क्र. ३ पाहा)

**तहहयात सभासद** : या कालावधीत एकही नवा तहहयात सभासद नोंदविण्यात आला नाही.

**वसंतव्याख्यानमाला** : मंडळाची ४७ वी वसंत व्याख्यानमाला शनिवार दिनांक २३ एप्रिल १९९४ ते सोमवार दिनांक २ मे १९९४ च्या दरम्यान आयोजित करण्यात आली. (अधिक माहितीसाठी परिशिष्ट क्र. ४ पाहा)

या व्याख्यानमालेत शेवटच्या दिवशी सुप्रसिध्द पत्रकार मा. श्री. माधवराव गडकरी यांच्या हस्ते मंडळाचे संस्थापक सभासद सर्वश्री मा. प्रकाशभाई मोहाडीकर, नारायण केशव तथा आबा पडते, नागेश वेलणकर आणि राजाभाऊ शेट्ये या मान्यवरांचा ह्रद्य सत्कार करण्यांत आला.

**केटरिंग व्यवस्था** : दि. १-१-९५ ते ३१-१२-९५ या कालावधीसाठी फक्त भांडी आणि डेकोरेशनसाठी 'पवन कॅटरर्स आणि डेकोरेटर्स' यांना निविदा पध्दतीने ठेकेदारी देण्यात आली.

**क्रीडा विभाग : खोखो** : विजय क्लब आयोजित कै. नरुभाऊ पाटील स्मृति चषक (राज्यस्तरीय) खो खो स्पर्धा, ठाणे महापौर चषक (अखिल भारतीय स्तरावरील स्पर्धा) विद्यार्थी क्रीडा केंद्र आयोजित कै. विवेकानंद गांवकर स्मृति (राज्यस्तरीय) खोखो स्पर्धा, मुंबई महापौर चषक (राज्यस्तरीय) खो खो स्पर्धा आणि औरंगाबाद महापौर चषक (राज्यस्तरीय) खो खो स्पर्धेत आपला महिला संघ सहभागी झाला होता. पहिल्या तीन स्पर्धांत आपल्या संघांनी उपांत्यफेरी गाठली तर शेवटच्या दोन स्पर्धांत ४ था क्रमांक मिळविला. औरंगाबाद आणि मुंबई महापौर चषक खो खो स्पर्धेत पुरुष संघाचाहि सहभाग होता. इतर काही ठळक वैशिष्टये खालीलप्रमाणे :

* महाराष्ट्र श्रमिक सेना यांच्यावतीने वांद्रे येथे आयोजित केलेल्या जोड

जिल्हे कुमार खो खो स्पर्धेत आपल्या कुमार संघाने उपविजेतेपद मिळवले या उपविजेतेपदाबद्दल, पदकांबरोबरच रु. ३०००/- चा धनादेश मिळाला. कु. धीरज राडये याला सर्वोत्कृष्ट अष्टपैलू खेळाडूचे पारितोषिक मिळाले.

❋ सांगली येथे झालेल्या पुरुष /महिला राज्य अजिंक्यपद खो खो स्पर्धेसाठी मुंबई जिल्हा संघातून कु. अर्चना मयेकर आणि कु. शिल्पा तोरणे यांची निवड .

❋ सोलापूर येथे झालेल्या राज्य कुमार खो खो चाचणीसाठी मुंबईच्या संघातून कु. अभ्युदय मुंज याची निवड.

❋ उमरगा (उस्मानाबाद) येथे झालेल्या सब ज्युनियर राज्य अजिंक्यपद खो खो स्पर्धेत मंडळाची कु. प्रीती धुरी हिला सर्वोत्कृष्ट अष्टपैलू खेळाडूचे पारितोषिक.

❋ इंचलकरंजी येथे झालेल्या पश्चिम विभाग खो खो स्पर्धेत महाराष्ट्राच्या महिला संघातून कु. शिल्पा तोरणे आणि कु. आदिती कांबळे यांचा समावेश.

❋ आंतरविद्यापीठीय खो खो स्पर्धेसाठी मुंबई विद्यापीठाकडून कु. उत्कर्षा शेणॉय, कु. अर्चना मयेकर आणि कु. अपर्णा वैद्य यांची निवड.

❋ परभणी येथे झालेल्या राज्य शालेय स्पर्धेत (ज्युनियर कॉलेज) राज्य संघ निवडीसाठी मुंबईतून कु. प्रमोद दोडगे आणि कु. अभ्युदय मुंज यांची निवड.

❋ मुंबई महापौर चषक आणि पैगांवकर स्मृति चषक खो खो स्पर्धेत दिवसाचे मानकरी म्हणून अनुक्रमे कु. प्रीती धुरी आणि कु. अर्चना मयेकर यांची निवड.

❋ खो खो संघाचे मार्गदर्शक श्री. प्रफुल्ल पाटील यांची मुंबईच्या ज्युनियर गट निवड समितीवर नियुक्ती.

❋ युनायटेड स्पोर्टस् क्लब ठाणे, सहकार क. क्रि. वि. मंडळ. वडाळा, विद्यार्थी क्रीडा केंद्र, परळ, ग्रेटर बॉम्बे पोलीस संघ (नायगांव), मुंबई विद्यापीठ संघ (मुंबई) आणि प्रबोधन (गोरेगांव) यांच्याशी पुरुष संघाचे मित्रत्वाचे सामने घेण्यात आले. श्री. समर्थ व्यायाम मंदिर (शिवाजी पार्क) यांच्याशी कुमार संघाचा सामना खेळविण्यात आला. प्रबोधन (गोरेगांव), आदर्श विद्या मंदिर, कासारवडवली (ठाणे), यांच्याबरोबर महिलांचे तर श्री समर्थ व्यायाम मंदिर (शिवाजी पार्क) यांच्याबरोबर मुलांचे मित्रत्वाचे सामने घेण्यात आले.

खो खो च्या दैनंदिन सरावाची जबाबदारी सर्वश्री रमेश वरळीकर प्रफुल्ल पाटील, संजीव पेडणेकर आणि रमेश नाटेकर यांनी सांभाळली.

❋ खेळांडूना आहारासंबंधी शास्त्रीय मार्गदर्शन मिळावे यासाठी तज्ज्ञ डॉ. मालती कारवारकर यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. तसेच खेळाडूंना होणाऱ्या दुखापतींच्या संदर्भात फिजीओथेरपिस्ट व महाराष्ट्राच्या माजी संघनायिका डॉ. (सौ). हेमलता देशमुख यांनी दोनवेळा खेळाडूंना मार्गदर्शन केले.

❋ मुंबई खो खो संघटनेच्या वतीने व मंडळाच्या सहकार्याने 'खो खो पंच व खेळाडू संघर्ष' या विषयावर एक चर्चासत्र आयोजित करण्यात आले. यासाठी विनामूल्य हॉल मंडळाने उपलब्ध करून दिला. त्यावेळी चहापान व जेवणाची व्यवस्था मंडळाने केली होती.

❋ महात्मा ज्योतिबा फुले कन्याशाळा, दादर या शाळेची आंतरवर्ग लंगडी स्पर्धा मंडळाने उत्तमप्रकारे आयोजित केली.

**कबड्डी** : मंडळाच्या महिलांच्या संघाने पुढील स्पर्धात भाग घेतला.
१) शिंदेवाडी, दादर, २) मुंबई जिल्हा अजिंक्यपद स्पर्धा, वडाळा
३) नवरत्न क्रिडा मंडळ. भायखळा ४) ज्ञानप्रकाश क्रीडा मंडळ, शिवडी
५) दुर्गामाता क्रिडा मंडळ, शिवडी. यासर्व स्पर्धा जिल्हा पातळीवरच्या होत्या.

इतर ठळक वैशिष्टये :

❋ **नवरत्न क्रिडा मंडळाच्या स्पर्धेत सावित्रीबाई फुले संघाविरुध्द सामन्यात**

सर्वोत्कृष्ट खेळाडू म्हणून कु. अस्मिता भराडे हिला पारितोषिक तसेच राज्य अजिक्यपद स्पर्धेसाठी मुंबईच्या संघातून तिची निवड.

* मुंबई महापौर चषक (अखिल भारतीय) स्पर्धेत महिलांच्या संघाचा सहभाग.
* कबड्डी खेळाडूंना सर्वश्री विष्णु हरमले, संजीव ठाकूरदेसाई आणि विजय राणे यांनी मार्गदर्शन केले.

**कला विभाग** : सर्वश्री विनोद हडप, दत्ता सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली मंडळाच्या कलाकारांनी राज्य नाटय स्पर्धेत शं. ना. नवरेलिखित 'हवा अंधार कवडसा' हे नाटक सादर केले. श्री. अशोक मरळ यांना यांतील 'सदानंद' भूमिकेसाठी विशेष प्रमाणपत्र मिळाले.

**इमारत निधी** : अहवाल काळात रु. ७५,०००/- (रुपये पंचाहत्तर) इमारत निधीमध्ये वर्ग करण्यात आले.

**देणगी** : सुप्रसिध्द क्रीडासमीक्षक मा. श्री. वि. वि. करमरकर यांना कै. एस्. एम्. जोशी पुरस्कार प्रदान करण्यात आला. त्या समारंभात मंडळ सहभागी झाले होते. त्यानिमित्त सहकार कला क्रीडा विज्ञान मंडळाद्वारे रु. १०१/- देणगी रूपात देण्यात आले.

**बांधकाम** : अहवाल काळात मंडळाची भिंत नव्याने बांधून घेण्यात आली. तसेच मैदान समपातळीवर आणून साफसफाई करण्यात आली. यासाठी मंडळाचे तहहयात सभासद इंजिनियर श्री. प्रकाश जवळकर यांनी सर्व कामकाजावर विनामूल्य देखरेख ठेवली. या व्यतिरिक्त नवीन नोटीस बोर्ड, खोखोचे खांब करुन घेण्यात आले तसेच कपाटांची डागडुजीही करण्यात आली.

## इतर :

* दि. १ जानेवारी १९९५ पासून सुधारित दर मंडळाच्या सभागृहाला लागू करण्यात आले.
* १९९३-९४ व १९९४-९५ या कालावधीसाठी 'ओपन एअर थिएटर' ची परवानगी घेण्यात आली.
* 'श्रमिक सेना' यांच्यावतीने घेण्यात आलेल्या कुमार खो खो स्पर्धेत उपविजयी ठरलेल्या मंडळाच्या संघातील खेळांडूना 'ट्रॅक सूट्स्' देण्याचा निर्णय घेण्यात आला.
* जुलै १९९४ पासून व्यायामशाळा सुरु करण्यात आली व्यायामशाळेत मंडळाचे खेळाडू आणि तहहयात सभासदांना विनामूल्य प्रवेश देण्याचा निर्णय घेण्यात आला.
* क्रीडाविभागासाठी रु. ४०,०००/- आणि कलाविभागासाठी रु. ३५,०००/- ची तरतूद करण्यात आली.
* धर्मादाय आयुक्तांकडे चालू असलेल्या चौकशी व दाव्यामध्ये मंडळ आणि पदाधिकारी यांची बाजू मांडण्यासाठी ॲड. ए. ए. इनामदार यांची नेमणूक करण्यात आली.
* गतवर्षीप्रमाणेच प्रजासत्ताक दिन आणि वर्धापन दिनानिमित्त दिनांक २६ जानेवारी ९५ रोजी सकाळी ध्वजवंदन आणि सायंकाळी स्नेहसंमेलन आयोजिले होते. सुप्रसिध्द संगीत दिग्दर्शक 'मा. श्री. अनिल मोहिले' यांचा 'संगीत रजनी' हा कार्यक्रम त्यानिमित्त आयोजित करण्यात आला.
* मंडळाचे अध्यक्ष श्री. शंकरराव साळवी यांना महाराष्ट्र शासनाच्या वतीने श्री शिवछत्रपती पुरस्कार देवून गौरविण्यात आले.
* महाराष्ट्र पोस्ट खात्यातर्फे आयोजित 'महापेक्स ९४' या टपाल तिकिटांचा प्रदर्शनांत विषयाधारित विभागात मंडळाचे कार्यवाह श्री. उमेश शेणॉय यांना त्यांच्या 'ऑलिपिंक - उगम, विस्तार आणि उत्कर्ष' या टपाल तिकिट संग्रहास रजत पदक व विशेष पदक देण्यात आले.

* * *

## श्रध्दांजली

दिनांक २४-९-९४ रोजी मंडळाचे संस्थापक सभासद मा. श्री. राजाभाऊ शेट्ये यांचे निधन झाले. दिनांक १४-१०-९४ रोजी झालेल्या शोकसभेत त्यांना श्रध्दांजली वाहण्यात आली.

# भविष्यकालीन योजना

* बांधकाम योजना कार्यान्वित करण्यासाठी प्रयत्नशील राहाणे.
* विविध कार्यक्रमांव्दारे मंडळाचा नावलौकिक वाढवणे.
* मंडळाची आर्थिक स्थिती अधिक मजबूत करणे.

या सर्वांसाठी व मंडळाच्या उत्तरोत्तर प्रगतीसाठी आपले बहुमोल सहकार्य आणि शुभाशीर्वादाची जरूरी आहे.

धन्यवाद!

आपले नम्र,
**उ. व्यं. शेणॉय**
कार्यवाह
कार्यकारी समितीसाठी

**श्रध्दांजली**

गेली २५ वर्षे मंडळात सेवक म्हणून काम करणारे श्री. अर्जुन गं. कुले (मामा) यांचे दिनांक २ जानेवारी १९९६ रोजी हृदय विकाराने निधन झाले. मंडळ एका प्रामाणिक सचोटीच्या कर्मचाऱ्याला कायमचं मुकले आहे. मंडळाच्या वतीने साश्रुपूर्ण श्रध्दांजली

# अमर हिंद मंडळ, दादर

## परिशिष्ट क्र. १

## सभा उपस्थिती तक्ता (१९९३-९४)

| पदाधिकारी/ सदस्य नाव | उपस्थिती कार्यकारी समिती सभा | सयुक्त सभा | एकुण उपस्थिती |
|---|---|---|---|
| डॉ. पां. वि. चंद्रात्रेय (अध्यक्ष) | ३ | १ | ४ |
| श्री. ह. गं. राणे (उपाध्यक्ष) | २ | - | २ |
| श्री. ए. ना. साटम (उपाध्यक्ष) | ३ | १ | ४ |
| श्री. श्री. का भोसले (कार्याध्यक्ष) | २ | - | २ |
| श्री. वि. श. मांढरे (कार्योपाध्यक्ष) | १ | १ | २ |
| श्री. उ. व्यं. शेणॉय (कार्यवाह) | १२ | ३ | १५ |
| श्री. अ. ग. भालेकर (संयुक्त कार्यवाह) | १ | ० | १ |
| श्री. स. श. रेडीज (कोषाध्यक्ष) | ११ | २ | १३ |
| श्री. सं. गं. ठाकूरदेसाई (स. कार्यवाह दि. १२-१०-९३ पासून) | १२ | २ | १४ |
| श्री. चिं. वि. नागले (कार्याध्यक्ष दि. १२-१०-९३ पासून) | १० | ३ | १३ |
| श्री. अ. अ. देशपांडे | १३ | २ | १५ |
| श्री. वि. अ. कानविंदे | ८ | ३ | ११ |
| श्री. चा. शां. थरवल | ७ | १ | ८ |
| श्री. अ. दि. पाटील | २ | १ | ३ |
| श्री. म. र. कुपेरकर | १ | ० | १ |
| श्री. ना. रा. नाबर | १ | ० | १ |
| श्री. न. ह. राणे | २ | ० | २ |
| श्री. रमेश मा. वरळीकर (दि. १२-१०-९३ पासून) | ३ | २ | ५ |

| पदाधिकारी/ सदस्य नाव | उपस्थिती | | |
|---|---|---|---|
| | कार्यकारी समिती सभा | सयुक्त सभा | एकूण उपस्थिती |
| श्री. म. ज. फडके (दि. १२-१०-९३ पासून) | ७ | २ | ९ |
| श्री. वि. दे. हरमले (दि. १२-१०-९३ पासून) | ६ | ३ | ९ |
| श्री. शं. ना. साळवी (अध्यक्ष) (दि. २३-२-९४ पासून) | २ | - | २ |
| श्री. दि. ना. पडते (दि. २३२-९४ पासून) | २ | १ | ३ |
| श्री. वि. शं. हडप (दि. २३-२-९४ पासून) | २ | १ | ३ |
| श्री. श्री. शं. राणे (दि. २३-२-९४ पासून) | २ | १ | ३ |
| श्री. भा. भि. केरकर (दि. २३-२-९४ पासून) | १ | १ | २ |

**विश्वस्त**

| | संयुक्त सभा | एकूण उपस्थिती |
|---|---|---|
| श्री. ना. के. पडते | ० | ० |
| श्री. ज. शं. परब | २ | २ |
| श्री. दि. शं. पाटील | २ | २ |

# अमर हिंद मंडळ, दादर

## परिशिष्ट क्र. २

# वसंत व्याख्यानमाला

### वर्ष ४६ वे

### गुंफलेली पुष्पे

| | | |
|---|---|---|
| सोमवार | दि. २६-४-९३ | उद्घाटन ज्येष्ठ पत्रकार मा. श्री. दि. वि. गोखले<br>विषय : दोन विचार प्रवाह |
| मंगळवार | दि. २७-४-९३ | मा. श्री. विद्याधर गोखले<br>विषय : मन करा रे प्रसन्न |
| बुधवार | दि. २८-४-९३ | मा. माजी न्यायमूर्ती श्री. चंद्रशेखर धर्माधिकारी, मा. श्री. यदुनाथ थत्ते व मा. श्री. यशवंत ब. क्षीरसागर (परिसंवाद)<br>विषय : सद्य परिस्थितीचा बालमनावर होणारा परिणाम |
| गुरुवार | दि. २९-४-९३ | मा. डॉ. जयंत आठवले<br>विषय : अध्यात्मशास्त्र |
| शुक्रवार | दि. ३०-४-९३ | मा. प्रा. गंगाधर गाडगीळ<br>विषय : ग्राहक राजा भिकारी |
| शनिवार | दि. १-५-९३ | मा. डॉ. प्रभाकर वामन रेगे<br>विषय : शिक्षण क्षेत्रातील सद्य : परिस्थिती |
| रविवार | दि. २-५-९३ | मा. सुप्रसिध्द संगीत दिग्दर्शक श्री. यशवंत देव यांचा नावीन्यपूर्ण कार्यक्रम 'ते सूर भावनांचे' सोबत सौ. करुणा देव यांचा वाचनाभिनय हा लोकप्रिय कार्यक्रम |
| सोमवार | दि. ३-५-९३ | मा. प्रा. (श्रीमती) पुष्पा भावे<br>विषय : आपले मराठीं नाटक आणि आपण |
| मंगळवार | दि. ४-५-९३ | मा. प्रा. श्री. गु. भा. मुळे, मा. श्री. दा. कृ. सोमण व मा. डॉ. हेमंत विंझे (परिसंवाद)<br>विषय : लोकभ्रम व विज्ञान |
| बुधवार | दि. ५-५-९३ | मा. प्रा. (श्रीमती) माधवी चाफेकर<br>विषय : संत साहित्याचा आधुनिक संदर्भ |

# अमर हिंद मंडळ, दादर
## त्रैवार्षिक निवडणूक निकाल
### परिशिष्ट क्र. ३

| अध्यक्ष : पदासाठी (जागा एक) | एकूण मिळालेली मते | शेरा (क्र.) |
|---|---|---|
| १) श्री. शंकरराव ना. साळवी (विजयी) | ११५ | १ |
| २) श्री. हरिश्चंद्र गं. राणे | ९० | २ |
| **उपाध्यक्ष पदासाठी** (जागा दोन) | | |
| १) श्री. एकनाथ ना. साटम (विजयी) | १२५ | १ |
| २) श्री. मधुकर ज. फडके (विजयी ) | ११७ | २ |
| ३) श्री. विलास पु. सारळकर | ९७ | ३ |
| **कार्यकारी समितीच्या सभासदासाठी** (अकरा जागा) | | |
| १) श्री. दिपक नारायण पडते (विजयी) | १२२ | १ |
| २) श्री. उमेश व्यंकटराव शेणॉय (विजयी) | १२२ | २ |
| ३) श्री. अरूण अनंत देशपांडे (विजयी) | १२१ | ३ |
| ४) श्री. सतीश शरदचंद्र रेडीज (विजयी) | १२१ | ४ |
| ५) श्री. रमेश माधवराव वरळीकर (विजयी) | ११८ | ५ |
| ६) श्री. विष्णु अनंत कानविंदे (विजयी) | ११७ | ६ |
| ७) श्री. चिंतामणी वि. नागले (विजयी) | ११५ | ७ |
| ८) श्री. विनोद शं. हडप (विजयी) | ११० | ८ |
| ९) श्री. चारूदत्त शां. थरवल (विजयी) | ११० | ९ |
| १०) श्री. भास्कर भिवा केरकर (विजयी) | १०८ | १० |
| ११) श्रीकृष्ण शंकर राणे (विजयी) | १०७ | ११ |
| १२) श्री. अनंत महादेव भाताडे | ९७ | १२ |
| १३) श्री. नरेन्द्र ह. राणे | ९६ | १३ |
| १४) अनंत गं. भालेकर | ९५ | १४ |
| १५) श्री. जयवंत अ. शिरसाट | ९४ | १५ |
| १६) श्री. विलास गोरेगावकर | ९२ | १६ |
| १७) श्री. शंकर रामचंद्र नाईक | ९२ | १७ |
| १८) श्री. सतीश पु. पेडणेकर | ९१ | १८ |
| १९) श्री. दिलीप दळवी | ९० | १९ |
| २०) श्री. प्रकाश ग. गांधी | ९० | २० |
| २१) श्री. दत्तात्रय तु, कदम | ९० | २१ |
| २२) श्री. समीर त्रिंबककर | ८८ | २२ |

नवीन कार्यकारी समिती दि. २३ फेब्रुवारी १९९४ पासून कार्यरत झाली.

# अमर हिंद मंडळ, दादर
### परिशिष्ट क्र. ४
### सभा उपस्थिती तक्ता (१९९४-९५)

| पदाधिकारी/ सदस्य नाव | उपस्थिती कार्यकारी समिती सभा | सयुक्त सभा | एकूण उपस्थिती |
|---|---|---|---|
| श्री. शं. ना. साळवी (अध्यक्ष) (कायम निमंत्रित) | २ | १ | ३ |
| श्री. ए. ना. साटम (उपाध्यक्ष) (कायम निमंत्रित) | २ | - | २ |
| श्री. म. ज. फडके (उपाध्यक्ष) (कायम निमंत्रित) | - | - | - |
| श्री. चिं. वि. नागले (कार्याध्यक्ष) | ९ | १ | १० |
| श्री. र. मा. वरळीकर (कार्योपाध्यक्ष) | ८ | १ | ९ |
| श्री. उ. व्यं. शेणॉय (कार्यवाह) | १२ | १ | १३ |
| श्री. सं. ग. ठाकूरदेसाई (स. कार्यवाह) स्वीकृत | ११ | १ | १२ |
| श्री. स. श. रेडीज (कोषाध्यक्ष) | ११ | १ | १२ |
| श्री. अ. अ. देशपांडे (सदस्य) | १० | १ | ११ |
| श्री. श्री. शं. राणे (सदस्य) | ५ | १ | ६ |
| श्री. दि. ना. पडते (सदस्य) | ३ | १ | ४ |
| श्री. वि. अ. कानविंदे (सदस्य) | ३ | - | ३ |
| श्री. वि. श. हडप (सदस्य) | ७ | - | ७ |
| श्री. चा. शां. थरवल (सदस्य) | ८ | १ | ९ |
| श्री. भा. भि केरकर (सदस्य) | ११ | १ | १२ |
| श्री. वि. दे हरमले | ८ | १ | ९ |
| श्री. सं. वि. पेडणेकर | ३ | १ | ४ |

परिशिष्ट क्र. ५

## वसंत व्याख्यानमाला

### वर्ष ४७ वे

### गुंफलेली पुष्पे

| | |
|---|---|
| शनिवार दि. २३-४-९४ | उद्घाटन डॉ. य. दि. फडके (अध्यक्ष, साहित्य संस्कृति मंडळ)<br>विषय : धर्म आणि राजकारण |
| रविवार दि. २४-४-९४ | मा. ॲड. अधिक शिरोडकर<br>विषय : मुंबईतील वाढती गुंडगिरी आणि टाडा |
| सोमवार दि. २५-४-९४ | 'ऑल दि बेस्ट' या नाटकाचा नाटयावलोकन कार्यक्रमः सर्वश्री मोहन वाघ, देवेंद्र पेम, अनंत अमेंबल आणि इतर कलाकार यांच्याशी बातचीत केली. श्री. राजीव जोशी, श्री. विनोद हडप आणि श्रीमती चारुशीला ओक यांनी. |
| मंगळवार दि. २६-४-९४ | सर्वश्री जनार्दन जाधव, नरेंद्र जाधव, दिनेश जाधव यांची मुलाखत<br>मुलाखतकार श्री. वामनराव देशपांडे<br>विषय :- आमचा बाप आणि आम्ही |
| बुधवार दि. २७-४-९४ | मा. पु. ग. तथा भय्या वैद्य<br>विषय : आजची शिक्षण पध्दती व उद्याचे शिक्षण |
| गुरुवार दि. २८-४-९४ | कविवर्य सर्वश्री वसंत बापट, विंदा करंदीकर आणि मंगेश पाडगांवकर : ''कविता वाचन'' |
| शुक्रवार दि. २९-४-९४ | सौ. व श्री. प्रि. मनोहर जोशी, सौ. व श्री. सुरेश प्रभू सौ. व श्री. शिरीष गुप्ते सौ. व श्री. श्रीधर फडके सौ. व श्री. अजय वढावकर यांच्याबरोबर अजितेम जोशी, राजीव जोशी आणि डॉ. किरण चित्रे यांची मेजवानी गप्पांची |
| शनिवार दि. ३०-४-९४ | डॉ. सरोजिनी वैद्य, श्री. नारायण आठवले, डॉ. रविन थत्ते, श्री. हरी नरके, श्री. आ. पां. देशपांडे<br>विषय : आपण आणि आपली भाषा |
| रविवार दि. १-५-९४ | उपायुक्त श्री. गो. रा. खैरनार<br>विषय : मुंबईच्या नागरी समस्या आणि अनधिकृत बांधकामे |
| सोमवार दि. २-५-९४ | ज्येष्ठ पत्रकार श्री. माधवराव गडकरी यांच्या व्याख्यानाने व्याख्यानमालेचा समारोप<br>विषय : राष्ट्राध्यक्ष पध्दती व स्वायत्त महाराष्ट्र<br>याचवेळी सर्वश्री प्रकाशभाई मोहाडीकर, नारायण केशव तथा आबा पडंते नागेश वेलणकर आणि राजाभाऊ शेटये या मंडळाच्या मान्यवर सदस्यांचा सत्कार करण्यात आला. |

## अमर हिंद मंडळ, दादर

### १ एप्रिल १९९४ ते ३१ मार्च १९९५ पर्यंत


विश्वस्त : श्री. ज. शं. परब
श्री. दि. शं. पाटील

अध्यक्ष : श्री. शं. ना. साळवी

उपाध्यक्ष : श्री. म. ज. फडके
श्री. ए. ना. साटम

कार्याध्यक्ष : श्री. चिं. वि. नागले

कार्योपाध्यक्ष : श्री. र. मा. वरळीकर

कार्यवाह : श्री. उ. व्यं. शेणॉय

सं. कार्यवाह : श्री. सं. ग. ठाकूरदेसाई (दि. २-४-९४ पासून)

कोषाध्यक्ष : श्री. स. श. रेडीज

सदस्य :

श्री. भा. भि. केरकर
श्री. अ. अ. देशपांडे
श्री. वि. अ. कानविंदे
श्री. श्री. शं. राणे
श्री. दि. ना. पडते
श्री. वि. शं. हडप
श्री. चा. शां. थरवल
श्री. वि. दे. हरमले (स्वीकृत)
श्री. सं. वि. पेडणेकर (स्वीकृत)